MHLA050001532018

नियमीत दिवाणी दावा क्र. ०५/२०१८

**आदेश नि.क्र. ७८ वर**

वादीने हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्याचा पुरावा बंद केल्याचा आदेश रद्द करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर प्रतिवादी क्र.४ ने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन खर्च बसवून अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. वादीच्या वकिलांचा युक्तिवाद असा की, दिनांक २०-२-२०२३ रोजी वादीचे साक्षीदार आजारी असल्याने न्यायालयात साक्ष देण्यासाठी येवू शकले नाहीत व त्यामुळे त्याचदिवशी वादीचा पुरावा बंद करण्यात आला. न्यायाच्यादृष्टीने तो आदेश रद्द करण्यात यावा. प्रतिवादीच्या वकीलांचे म्हणणे असे की अर्जात नमूद केलेल्या कारणासाठी वादीने वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केले नसल्याने ते कारण खरे असल्याचे दिसून येत नाही. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. प्रकरणाचे अभीलेख पाहिले असता वादीतर्फे नि.क्र. ७५ व ७६ वर साक्षीदारांचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहेत. दिनांक २०-२-२०२३ रोजी प्रतिवादीचे वकील उलटतपास घेण्यास हजर होते. तथापी, वादीचे साक्षीदार हजर राहिले नाहीत. त्याचप्रमाणे वादीच्या वकीलांनी साक्षीदाराच्या गैरहजेरीबाबत अर्ज सादर केला नाही. त्यामुळे वादीचा पुरावा बंद करण्यात आला. वादीचे दोन्ही साक्षीदार त्याचदिवशी आजारी होते हे कारण

संयुक्तिक वाटत नाही. त्याचप्रमाणे साक्षीदार आजारी असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केलेले नाही. सदरचा दावा हा स्थावर मालमत्तेतील हक्क व अधिकार ठरवण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा गुणदोषावर व दोन्ही बाजुंना पुरावा देण्याची पूर्ण संधी देवून निकाली काढणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीस पुरावा देण्याची  संधी देणे न्यायोचित होणार आहे. परंतु वादीने जी दिरंगाई केली आहे त्याबाबत त्याला संधी देत असतांना खर्च बसविणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

वादीचा पुरावा बंद केल्याचा आदेश प्रतिवादी क्र.४ ला खर्च रक्कम रूपये ५००/– देण्याच्या अटीवर रद्द केला आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2023.06.09 17:28:01 +0530

**(प्र. अ. सवदीकर)**

दिनांक ०९/०६/२०२३.            दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपुर

जिल्हा लातूर.